महाराष्ट्र 'क' वर्ग नगर परिषद / नगर पंचायत क्षेत्र राज्य रोजगार हमी योजनेची राज्यात अंमलबजावणी करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
शासन शुध्दीपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.५५/रोहयो-१०
१६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२१

वाचा : १) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सुधारणा २००६)
२) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो-२००५/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दि. २३ डिसेंबर, २००५.
३) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.५५/रोहयो-१०, दिनांक १६ एप्रिल, २०१३.
४) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.५५/रोहयो-१०, दिनांक ०३ मार्च, २०१४.

शासन शुध्दीपत्रक :-

शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो-२०१२/ प्र.क्र.५५/ रोहयो – १०, दिनांक ०३ मार्च, २०१४ अन्वये "महाराष्ट्र 'क' वर्ग नगर परिषद / नगर पंचायत क्षेत्र राज्य रोजगार हमी योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत" निर्णय घेण्यात आला आहे. तथापि दिनांक ०३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ मधील (ii) मध्ये वित्तीय वर्षाचा आराखडा विभागीय आयुक्तांमार्फत संचालक, नगरपरिषद / नगरपंचायत यांना सादर करतील अशी तरतूद आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाचा या प्रक्रीयेत प्रत्यक्ष सहभाग नसल्यामुळे प्रकरणे मंजूर होण्यास अकारण कालापव्यय होतो. सबब दिनांक ०३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

परिच्छेद क्र. ३ (ii) **जिल्हाधिकारी** – राज्य शासन जिल्हाधिकारी यांना या अधिनियमाखाली कार्य पार पाडण्याकरिता आवश्यक असे सर्व प्रशासकीय व वित्तीय अधिकार सोपवित आहे. जिल्हाधिकारी या अधिनियमाखालील कार्य व योजना पार पाडण्याकरिता जिल्ह्यातील सर्व स्थानिक प्राधिकरणे, संस्था व अधिकारी त्यास सहाय्य करण्यास जबाबदार असतील. जिल्हाधिकारी जिल्ह्यातील अंगमेहनतीच्या अकुशल कामासाठी कामाचा अपेक्षित मागणीचा तपशील आणि किती रोजगार पुरविता येईल याबाबत तपशीलवार योजना असणारा पुढील वित्तीय वर्षाचा मजुर आराखडा प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर महिन्यात तयार करतील व विभागीय आयुक्तांमार्फत संचालक, नगर परिषद/ नगर पंचायत यांना सादर करतील. जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद / नगर पंचायत प्रशासन हे जिल्हाधिकाऱ्यास सहाय्य करण्यास जबाबदार असतील.

ऐवजी

परिच्छेद क्र. ३ (ii) **जिल्हाधिकारी** – राज्य शासन जिल्हाधिकारी यांना या अधिनियमाखाली कार्य पार पाडण्याकरिता आवश्यक असे सर्व प्रशासकीय व वित्तीय अधिकार सोपवित आहे. जिल्हाधिकारी या अधिनियमाखालील कार्य व योजना पार पाडण्याकरिता जिल्ह्यातील सर्व स्थानिक प्राधिकरणे, संस्था व अधिकारी त्यास सहाय्य करण्यास जबाबदार असतील. **"जिल्हाधिकारी जिल्ह्यातील अंगमेहनतीच्या अकुशल कामासाठी कामाचा अपेक्षित मागणीचा तपशील आणि किती रोजगार पुरविता येईल याबाबत तपशीलवार योजना असणारा पुढील वित्तीय वर्षाचा मजुर आराखडा**

Scanned with CamScanner

प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर महिन्यात तयार करतील व संचालक, नगर परिषद / नगर पंचायत यांना सादर करतील." जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद / नगर पंचायत प्रशासन हे जिल्हाधिकाऱ्यास सहाय्य करण्यास जबाबदार असतील असे वाचावे.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२१०८१०१४५७१६५६१६ असा आहे. हे शासन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally

(संजना खोपडे)
उप सचिव, रोहयो
महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद,
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहायक,
७) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र, नागपूर,
९) सर्व विभागीय आयुक्त,
१०) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून),
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१२) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
१३) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे.
१५) संचालक, फलोत्पादन, पुणे.
१६) संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
१७) आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१८) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) विभाग, पुणे.
२१) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ रोजगार हमी समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२२) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो),
२३) सर्व जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद / नगर पंचायत,
२५) सर्व उप सचिव / अवर सचिव / सहायक संचालक / कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग)
२६) निवडनस्ती, रोहयो-१०

Scanned with CamScanner